नॅक व्दारा "अ" प्रमाणित

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
## ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल

### विद्यापीठातील कॅम्पस मुलाखतींमध्ये नऊ विद्यार्थ्यांची निवड.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट सेलतर्फे व्यवस्थापनशास्त्र विभागामध्ये श्रीराम जनरल इन्शुरन्स कंपनीस कॅम्पस मुलाखती घेऊन विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

कंपनीतर्फे श्री. संत सिंघ यांनी उपस्थित ३७ एम.बी.ए., बी.बी.ए., एम.कॉम इ. विषयाच्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन नऊ विद्यार्थ्यांची निवड केली. या विद्यार्थ्यांना कंपनीने वार्षिक २ लाखांचे पॅकेज देऊ केले असून त्यांना महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये नियुक्त केले जाणार आहे.

या मुलाखतींसाठी विद्यापीठातील व्यवस्थापनशास्त्र विभाग, देवगिरी महाविद्यालय, एम.जी.एम, राजर्षी शाहू महाविद्यालय येथून विद्यार्थी उपस्थित होते. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे व्यवस्थापनशास्त्र विभागाचे संचालक डॉ. वाल्मिक सरवदे तसेच विद्यापीठाचे प्लेसमेंट अधिकारी डॉ. गिरीश काळे यांनी अभिनंदन केले.

डॉ. गिरीश काळे
प्लेसमेंट अधिकारी

# Shriram General Insurance Pvt. Ltd.




